## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्रमांक/रातुमनावि/१६/साप्र/ १४८६ दिनांक : २० ऑक्टोंबर, २०१६

### निविदा सुचना

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात वेळोवेळी आयोजित होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे (दीक्षांत समारंभ, वर्धापन दिन, व्याख्यानमाला इत्यादी व विद्यापीठातील विविध विभागाद्वारे आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम) छायाचित्र व चलछायाचित्र काढण्याचे काम पुढील पांच वर्षाकरीता देण्यासाठी अनुभवी, पंजीकृत संस्था कंत्राटदाराकडून द्विलिफाफा पध्दतीने सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाच्या कार्यक्रमाचे छायाचित्र व चलछायाचित्र बाबतची कामे खालील प्रमाणे असतात.

| अ.क्र. | कामाचे विवरण |
|---|---|
| १. | चलछायाचित्र (व्हीडीओ) (संपुर्ण कार्यक्रम) |
| २. | ग्रुप फोटो (१४'' x १०'') |
| ३. | कॅबीनेट फोटो कलर (५'' x ७'') प्रती नग |
| ४. | समूह छायाचित्र (लॅमिनेशन सह) |
| **मागणीनुसार** | |
| ५. | प्लाझमा टी.व्ही. ४२'' संच केबलजोडणीसह थेटप्रक्षेपणाकरिता प्रती नग |
| ६. | व्हीडीओ कॅमेरा (एच.डी.व्ही.) झेड– ५ ऑनलाईन थेट प्रक्षेपण संच मिक्सरसह प्रति नग ४ कॅमेऱ्यांसहित |
| ७. | समारंभाच्या व्हिडीओ डि.व्हि.डी. |

याव्यतिरिक्त वर्धापनदिन व इतर काही कार्यक्रम महत्वाच्या स्वरूपाचे असतात. अशा कार्यक्रमाचे छायाचित्र व चलछायाचित्र बाबतची कामे खालील प्रमाणे असतात.

| अ.क्र. | कामाचे विवरण |
|---|---|
| १. | चलछायाचित्र (व्हीडीओ) (संपुर्ण कार्यक्रम) |
| २. | कॅबीनेट फोटो कलर (५'' x ७'') प्रती नग |

व्याख्यानमालेकरिता छायाचित्र व चलछायाचित्र बाबतची कामे खालील प्रमाणे असतात.

| अ.क्र. | कामाचे विवरण |
|---|---|
| १. | चलछायाचित्र (व्हीडीओ) (संपुर्ण कार्यक्रम) |
| २. | कॅबीनेट फोटो कलर (५'' x ७'') प्रती नग |

संबंधीत निविदाकर्त्यांनी आपली निविदा **सिलबंद लिफाफा क्रमांक १ मध्ये E.M.D. आणि Technical Bid संबंधीचे दस्ताऐवज व सिलबंद लिफाफा क्र. २ मध्ये Commercial Bid लिफाफा क्रमांक १ व २ लिफाफा क्रमांक ३ मध्ये सादर करावी. इच्छूक कंत्राटदारांनी निविदा प्रपत्र व इतर अटींची प्रत सुटीचे दिवस सोडून रू. ५००/- रोखीने अथवा धनाकर्ष (Finance & Accounts Officer या नावाने)विद्यापीठाच्या लेखा (आगम) शाखेत जमा करून त्याची पावती दिनांक २१ ते २९ ऑक्टोबर, २०१६ या कालावधीमध्ये** कार्यालयीन वेळेत सामान्य प्रशासन शाखेत दाखवून प्राप्त करता येईल.

सिलबंद निविदा **दिनांक २ नोव्हेंबर, २०१६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत सामान्य प्रशासन शाखेमध्ये स्वीकारण्यात येतील.** तसेच प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा **दिनांक २ नोव्हेंबर, २०१६ रोजी सांय. ४.०० वाजता उपकुलसचिव (सा.प्र.) यांच्या दालनात सर्वांसमक्ष उघडण्यात येतील.** निविदा उघडण्याच्या वेळी संबंधित कंत्राटदार किंवा त्यांचे प्रतिनिधी स्वखर्चाने उपस्थित राहू शकतील.

कोणतेही कारण न दर्शविता असमाधानकरक निविदा किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकर्त्यांनी राखून ठेवलेला आहे.

**टिप : मा. राष्ट्रपती व मा. राज्यपाल इत्यादींच्या कार्यक्रमांचे यापुर्वी कार्य केल्याबाबतच्या कार्यानुभवाचे प्रमाणपत्र संबंधीत कार्यालय/संस्थेद्वारा असल्यास जोडावे. (प्राधान्यासाठी)**

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव